मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# सात वर्षांनंतरही बटरफ्लाय पुलाचे काम सुरूच

## दोन्ही बाजूच्या जोडरस्त्याचे काम अपूर्ण : पालिकेच्या कासवगती कारभारावर नागरिक नाराज

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड येथे पवना नदीवर बटरफ्लाय (फुलपाखरू) आकारातील स्टील गर्डरमधील पुलाच्या उभारणीचे काम पूर्ण झाले आहे. पुलाला जोडणाऱ्या दोन्ही बाजूच्या जोडरस्त्याचे काम अपूर्ण असल्याने हा पूल सात वर्षांनंतरही अपूर्ण स्थितीत आहे. महापालिकेच्या या कासवगती कारभारावर नाराजी व्यक्त केली जात आहे.

चिंचवडगाव व थेरगाव या दोन भागांना जोडणारा हा पूल आहे. थेरगाव येथील विकास आराखड्यातील 18 मीटर रस्त्यावर हा पूल तयार केला जात आहे. मोरया गोसावी मंदीरपासून काही अंतरावर हा पूल आहे.



सन 2016-17 या आर्थिक वर्षात पुलाच्या कामासाठी निविदा काढण्यात आली. त्यानंतर कामाला सुरुवात झाली. कामासाठी 25 कोटी 19 लाख रुपये इतका खर्च मंजूर आहे. या पुलासाठी नदीपात्रामध्ये एकही पिलर टाकलेला नाही. त्यामुळे पवना नदीचा प्रवाहाला कोणताही अडथळा निर्माण झालेला नाही, असा दावा महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी केला आहे.

पुलावरील डांबरीकरण आणि जोडस्त्याचे काम सुरू आहे. 107 मीटर लांबीचा हा पूल आहे. 18 ते 28.20 मीटर इतकी पुलाची रुंदी आहे. कामास सात वर्षे लोटली तरीही पुलाचे काम पूर्ण झालेले नाही. पुलाला जोडणाऱ्या चिंचवड तसेच, थेरगाव या दोन्ही बाजूचे काम अपूर्ण आहे. त्यामुळे काम रखडल्याचे सांगितले जात आहे.

### सोसायटीचा अडथळा दूर झाल्याने काम सुरू

बटरफ्लाय पुलाच्या जोडरस्त्याजवळ एका हाऊसिंग सोसायटीची सीमाभिंत आहे. खोदकामामुळे भिंतीला धोका निर्माण होऊ शकतो, असा आक्षेप घेत सोसायटीने पोलिसांत तक्रार केली होती. त्यामुळे हे काम रखडले होते. सोसायटीचे पदाधिकारी, ठेकेदार व महापालिका अधिकारी यांची पोलिस ठाण्यात झालेल्या बैठकीत या कामास होकार दिल्याने काम सुरू करण्यात आले आहे, असे सहशहर अभियंता देवन्ना गट्टूवार यांनी सांगितले.

### वाहतुकीवरील ताण कमी होणार

**» चिंचवडगाव आणि थेरगाव या दोन भागांना जोडणारा हा पूल आहे. धनेश्वर मंदिराजवळ छोटा पूल आहे. तो पूल अरुंद असल्याने तेथून टेम्पो, ट्रॅक, बस अशा अवजड वाहनांची वाहतूक होत नाही. त्यामुळे प्रसूनधाम सोसायटीशेजारी नव्याने उभारण्यात येत असलेला नवा बटरफ्लाय पूल वाहतुकीसाठी फायदेशीर ठरणार आहे. या पुलाने दोन्ही बाजूला सुलभपणे ये-जा करता येणार आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.**

# पिंपरीत आठवे आंतरराष्ट्रीय आयुर्वेद संमेलन 1 व 2 फेब्रुवारीला भरणार!

## डॉ. डी. वाय पाटील कॉलेज ऑफ आयुर्वेद अँड रिसर्च सेंटरचा पुढाकार

**पिंपरी | प्रतिनिधी**

डॉ. डी. वाय. पाटील (अभिमत) विद्यापीठ संचालित डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आयुर्वेद अँड रिसर्च सेंटर पुणे, यांच्या पुढाकाराने नवी दिल्ली येथील ऑल इंडिया आयुर्वेद कॉंग्रेस, नेदरलँड येथील इंटरनॅशनल महर्षी आयुर्वेद फाउंडेशन व इंटरनॅशनल अकॅडमी ऑफ आयुर्वेद यांच्या सहकार्याने आयोजित आठव्या इंटरनॅशनल आयुर्वेद कॉंग्रेसचे (आंतरराष्ट्रीय आयुर्वेद संमेलन) आयोजन करण्यात आले आहे. हे दोन दिवसीय आयुर्वेद संमेलन पिंपरी येथील विद्यापीठाच्या सभागृहात दि. १ व २ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार आहे. जगभरातून आयुर्वेदातील तज्ज्ञ, संशोधक, अध्यापक आणि विद्यार्थी सहभागी होतील. आयुर्वेदातील विविध विषयावर व्याख्याने, शोधनिबंध सादरीकरण व विचार मंथन होणार आहे, अशी माहिती डॉ. डी. वाय. पाटील (अभिमत) विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. स्मिता जाधव यांनी दिली.




प्रसंगी ब्राझील येथील आयुर्वेदाचार्य डॉ. जोस रोगे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. गुणवंत येवला, संशोधन संचालक प्रा. डॉ. अस्मिता वेले, कायाचिकित्सा विभागप्रमुख प्रा. डॉ. डी. जी. दीपांकर, रचना विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. योगेश कुट्टे आदी उपस्थित होते. ब्राझिलमधील आयुर्वेदाचे १६ विद्यार्थी या आंतरराष्ट्रीय आयुर्वेद संमेलनासाठी दाखल झाले आहेत.

डॉ. स्मिता जाधव म्हणाल्या, "या दोन दिवसीय आयुर्वेद संमेलनास भारत सरकारच्या आयुष मंत्रालय, तसेच नॅशनल कमिशन फॉर इंडियन सिस्टीम ऑफ मेडिसिनची मान्यता प्राप्त झाली आहे. या संमेलनाच्या माध्यमातून आयुर्वेदातील संशोधन, नाविन्यपूर्ण संशोधन, भविष्यकाळात आयुर्वेदाची व्याप्ती, गरजा, उपाय योजना आणि अनेक विकार आणि चिकित्सा या विषयावर विचारमंथन होणार आहे. तसेच आंतरराष्ट्रीय संस्थांशी संलग्नता व माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुढाकार घेऊन आणलेली 'एकात्मिक आरोग्य योजना', 'हील इन इंडिया' या योजनांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हे आंतरराष्ट्रीय आयुर्वेद संमेलन महत्वपूर्ण ठरेल. आंतरराष्ट्रीय स्तरावर आयुर्वेद, तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण प्रयोग याविषयी जाणून घेण्याची संधी अशा संमेलनातून विद्यार्थ्यांना मिळते. संशोधन वृत्ती वाढून इनोव्हेशन, स्टार्टअप्स संस्कृतीला चालना मिळते."

संमेलनात दुसऱ्या दिवशी केंद्रीय आयुष मंत्री (स्वतंत्र कार्यभार) प्रतापराव जाधव यांचे विशेष संबोधन असणार आहे. या संमेलनात दहा देशातील १०० पेक्षा अधिक आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ आणि १२०० हून अधिक राष्ट्रीय स्तरावरील संशोधक, वैद्य, प्राध्यापक आणि विद्यार्थी सहभागी होत आहेत. देश-परदेशातील आयुर्वेदाशी निगडित ५०० हुन अधिक विद्यार्थी, डॉक्टर व संशोधक आपले शोधनिबंध सादर करणार आहेत.

# बांगलादेशीपेक्षा येमेन, युगांडाचे घुसखोर अधिक

## घुसखोरांविरोधात कडक होणार : पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांचे आश्वासन

**पुणे | प्रतिनिधी**

अभिनेता सैफ अली खानच्या फ्लॅटमध्ये बांगलादेशी घुसखोराने केलेल्या कृत्यानंतर महाराष्ट्र पोलिस सक्रिय झाले आहेत. पुण्यातदेखील परदेशी घुसखोरांचा शोध घेतला जात आहे. शहरात बांगलादेशी घुसखोरांपेक्षा येमेन, युगांडा, अफगाणिस्तान आणि नायजेरिया येथील लोक अधिक असल्याचे पोलिसांकडे असलेल्या मागील ५ वर्षांच्या आकडेवारीवरून दिसून येत आहे. यानुसार, येमेन येथील ६३, युगांडा येथील ५३, अफगाणिस्तानातील २८ आणि नायजेरियातील १७ नागरिकांना अटक केली आहे.



बांगलादेशातून आलेले केवळ चार घुसखोर असल्याचे पुढे आले असून, त्यांना त्यांच्या देशात परत पाठविण्यासाठी पुणे पोलिसांना जादा परिश्रम घ्यावे लागत आहेत. अधिक माहितीनुसार, गेल्या ५ वर्षांमध्ये २५२ घुसखोरांना पोलिसांनी पकडले. यामध्ये पाकिस्तानचे ३, थायलंडचे २०, अमेरिकेचे १२, दक्षिण सुदानचे ५ यासह ३५ वेगवेगळ्या देशांतील घुसखोर जे कोणत्याही व्हिसाशिवाय अथवा व्हिसाचा कालावधी संपल्यानंतरदेखील पुण्यात वास्तव्य करत होते. याबाबत बोलताना पोलिसांनी सांगितले की, येमेन आणि युगांडा येथील नागरिक वैद्यकीय उपचाराच्या नावाखाली, तर नायजेरियन शिक्षणाच्या नावाखाली शहरात येतात. यानंतर त्यांच्या व्हिसाची मुदत संपल्यानंतरदेखील ते शहरातच वास्तव्य करतात. अशा लोकांना शोधून पोलिस त्यांच्यावर कारवाई करतात. पोलिसांपासून वाचण्यासाठी दलाल त्यांना राष्ट्रगीत शिकवतात, अशी माहितीदेखील समोर आली आहे. १६ जानेवारी रोजी स्वारगेट पोलिसांनीदेखील २००४ सालापासून देशात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकाला पकडले होते. यावेळी त्याच्याकडून ७ आधार कार्ड, ७ पॅन कार्ड, ४ पासपोर्ट, पाकिस्तानी चलनी नोट, सौदी अरेबिया, कुवेत, कतार, मलेशियाचे चलन जप्त करण्यात आले होते.

### घुसखोरांवर कडक कारवाईच्या केंद्राच्या सूचना

» केंद्रीय गृह विभागाकडूनदेखील महाराष्ट्रातील परदेशी घुसखोरांना शोधून त्यांच्यावर कडक कारवाई करण्याच्या सूचना राज्याचे मुख्य सचिव आणि पोलिस महासंचालकांना देण्यात आल्या आहेत. राज्यातील बांगलादेशी आणि म्यानमार येथून आलेल्या घुसखोरांना शोधून त्यांच्यावर तत्काळ कायदेशीर कारवाई करण्याचे लेखी आदेश केंद्राकडून देण्यात आले आहेत.

“ शहरात अवैध पद्धतीने वास्तव्य करणाऱ्या घुसखोरांविरोधात कडक कारवाई केली जाईल. त्याबाबतचे आदेशदेखील दिले आहेत. बनावट कागदपत्रे बनवणाऱ्यांवरदेखील कायदेशीर कारवाई केली जाणार. तसेच शहरात सापडलेल्या घुसखोरांना त्यांच्या देशात पाठविण्याबाबतदेखील योग्य ती पावले उचलली जातील.

**- अमितेश कुमार, पोलिस आयुक्त, पुणे.**

# आमदार सुनील शेळके यांची जिल्हाधिकाऱ्यांच्या सोबत बैठक

## जनसंवाद यात्रेदरम्यान नागरिकांनी उपस्थित केलेल्या अडचणींवर सखोल चर्चा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या सोबत मावळचे आमदार सुनील शेळके यांनी तालुक्यातील प्रलंबित कामांबाबत बैठक घेतली. या बैठकीत प्रामुख्याने मागील आठवड्यातील लोणावळा व खंडाळा परिसरात जनसंवाद यात्रेदरम्यान नागरिकांनी उपस्थित केलेल्या अडचणींवर सखोल अशी चर्चा करण्यात आली.



लोणावळा शहरातील भांगरवाडी – नांगरगाव दरम्यान रखडलेल्या उड्डाणपुलाचे काम मार्गी लावणेसाठी एक महिन्यांच्या आत मोजणी करून भुसंपादन प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी, त्याचप्रमाणे ठेकेदाराने १५ मार्च २०२५ पूर्वी पुलाचे काम तातडीने चालू करण्याबाबत आदेश देखील देण्यात आले. तसेच लोणावळा शहरातील महात्मा फुले भाजी मंडईचे काम हे नगरपरिषदेच्या निधीतून करणेबाबत पुढील कार्यवाहीबाबत व इतर आवश्यक बाबींसाठी व्यापारी बांधवांशी चर्चा करण्याबाबत नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना प्रामुख्याने सूचना आमदार सुनील शेळके व जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

रामनगर येथील गायरान जागा घरकुलांसाठी उपलब्ध होणेसाठी नवीन कन्सल्टंट नेमून लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी खंडाळा तलावाशेजारील गेल्या अनेक वर्षापासून राहत असलेल्या बांधवांना नवीन घरे बांधून देण्याबाबत तसेच त्यांच्या इतर मुलभूत गरजांबाबत सकारात्मक चर्चा यावेळी झाली. त्याचप्रमाणे खंडाळा येथील माध्यमिक शाळेच्या इमारतीसाठी प्रस्तावित जागेची भूसंपादन प्रक्रिया तात्काळ करण्याबाबत नगरपरिषद प्रशासनास सूचना देखील देण्यात आल्या.

लोणावळा शहरात नवीन स्वस्त धान्य दुकान परवाने सुरु करण्यात येऊन नागरिकांना चांगल्या दर्जाचे धान्य मिळणेबाबत मागणी देखील जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली त्याचप्रमाणे मावळ तालुक्यात पात्र शिधापत्रिका धारकांना स्वस्त धान्य उपलब्ध होणेसाठी इष्टांक वाढवून मिळणे, इंदोरी येथील शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा लाभ मिळावा, रिंगरोड बाधित शेतकऱ्यांच्या अडचणी, देहू शहरातील ग्रामीण रुग्णालय व घनकचरा व्यवस्थापन यांसाठी गायरान जागेची मागणी अशा विविध विषयांवर सकारात्मक बैठक पार पडली.

# पिंपरी-चिंचवड मनपातर्फे शहरातील बिल्डर्सवर कारवाईचा बडगा....

## हवा प्रदूषण करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांना नोटीस; हवा आणि ध्वनी प्रदूषणावर तत्काळ उपाय न केल्यास बांधकामाला स्थगिती देण्याचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पर्यावरण नियमांचे उल्लंघन करत हवा आणि ध्वनी प्रदूषण करणाऱ्या शहरातील तब्बल २२१ बड्या बांधकाम व्यावसायिकांना महापालिकेच्या बांधकाम विभागाने नोटीस बजावली आहे.

पर्यावरण नियमांचे उल्लंघन करत हवा आणि ध्वनी प्रदूषण करणाऱ्या शहरातील तब्बल २२१ बड्या बांधकाम व्यावसायिकांना महापालिकेच्या बांधकाम विभागाने नोटीस बजावली आहे. हवा आणि ध्वनी प्रदूषणावर लक्ष देवून तत्काळ योग्य त्या उपाययोजना कराव्या. अन्यथा बांधकाम प्रकल्पाच्या कामकाजाला स्थगिती देण्यात येईल, असा इशारा महापालिकेच्या बांधकाम विभागाने दिला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात नागरीकरण वेगाने वाढले आहे. त्यामुळे बांधकाम प्रकल्पाची कामेदेखील मोठ्या प्रमाणात वाढली आहेत. रात्रंदिवस बांधकाम प्रकल्पाची कामे सुरु आहेत. शहरातील वाढते औद्योगिकीकरण, बांधकामांच्या कामामुळे हवा आणि ध्वनी प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. तसेच हवेचा निर्देशांक खराब होवून नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊ लागला आहे.

नागरिकांना चांगले जीवनमान देण्याच्या हेतूने पिंपरी-चिंचवड महापालिकेने शाश्वत आणि पर्यावरणपूरक बांधकाम पद्धती स्वीकारली आहे. याकरिता महापालिकेने नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. त्यानुसार औद्योगिक आणि बांधकाम प्रदूषणावर पाळत ठेवणारी एजन्सी नेमण्यात आली. यामध्ये ३२ क्षेत्रीय कर्मचाऱ्यांसह आठ वॉर्डांमध्ये कार्यरत आहे. नियमांच्या उल्लंघनावर लक्ष ठेवण्यासाठी कर्मचारी तैनात करण्यात आले.

शहरातील हवा, ध्वनी आणि जल प्रदूषण करत पर्यावरण नियमांचे उल्लंघन करण्यावर कडक कारवाईचे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी दिले होते. बांधकामाच्या ठिकाणी हवा आणि ध्वनी प्रदूषण नियंत्रक उपाययोजनांची अंमलबजावणी केलेली नाही, अशा बांधकाम व्यावसायिकांवर महापालिकेच्या बांधकाम विभागाकडून दंडात्मक कारवाई सुरु करण्यात आली आहे. तसेच दंडात्मक कारवाई नंतरही कोणतीही सुधारणा न केल्यास संबंधित बांधकामाला स्थगिती देण्यात येत आहे.



### लोकप्रतिनिधींचाही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग

» पिंपरी-चिंचवड शहरातील आजी-माजी खासदार, आमदार, महापौर, नगरसेवक यांचे नातेवाईक आणि अन्य व्यावसायिक भागीदारांचा या प्रकरणात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग असल्याचे महापालिकेने बजावलेल्या नोटिशीतून दिसून येत आहे.

### 31 लाख 48 हजाराचा दंड वसूल

» महापालिका हद्दीतील बांधकाम व्यावसायिकांवर आठ क्षेत्रीय कार्यालयातील पथकाकडून कारवाई केली आहेत. त्यानुसार शहरातील २२१ बांधकाम व्यावसायिकांना नोटीस देत बांधकाम विभागाकडून ३१ लाख ४८ हजार रुपये दंड वसूल केला आहे. दरम्यान, महापालिकेने हवेच्या गुणवत्तेचा सुधारण्यासाठी बांधकाम व्यावसायिकांवर दंडात्मक कारवाईसह बांधकामाला स्थगिती देण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार शहरातील बांधकाम व्यावसायिकांनी हवा खराब होवू नये. ध्वनी प्रदूषण होऊ नये, याकरिता योग्य त्या उपाययोजना करण्याचे आदेशदेखील देण्यात आले आहेत.

"हवा आणि ध्वनी प्रदूषण होऊ नये म्हणून बांधकाम व्यावसायिकांना योग्य त्या उपाययोजना करण्याचे निर्देश आहेत. बांधकाम परवानगी देताना संदर्भ क्रमांक पाचमधील आदेशानुसार बांधकाम करणे अपेक्षित आहे. परंतु अनेक बिल्डरांकडून पर्यावरण नियमांचे उल्लंघन होत आहे. चालू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी हवा आणि ध्वनी प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजना नसल्यास बिल्डरांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे."

- मकरंद निकम, शहर अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका

# खर्च वाढला पण यंत्रणेत सुधारणा नाहीच

## 64 कोटींच्या पाणीपुरवठा प्रकल्पाचा खर्च गेला 114 कोटींवर; वितरण व्यवस्थेतील गळती सुरुच

**पिंपरी | प्रतिनिधी**

उद्योगपूरक वातावरण निर्मिती व उद्योजकांच्या अडीअडचणींवर तत्काळ कार्यवाही होण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत आता औद्योगिक तक्रार निवारण पथकाची नव्याने स्थापना करण्यात आली आहे. या पथकाचे प्रमुख सहायक पोलीस आयुक्त डॉ. विशाल हिरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

उद्योगपूरक वातावरण निर्मिती व उद्योजकांच्या अडीअडचणींवर तत्काळ कार्यवाही होण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत आता औद्योगिक तक्रार निवारण पथकाची नव्याने स्थापना करण्यात आली आहे. या पथकाचे प्रमुख सहायक पोलीस आयुक्त डॉ. विशाल हिरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तलयाअंतर्गत सुमारे ४० ते ४५ लाख इतकी लोकसंख्या आहे. आळंदी- मरकळ, भोसरी, चाकण, हिंजवडी, तळेगाव दाभाडे ही औद्योगिक क्षेत्र आयुक्तालयाच्या अखत्यारीत येतात. या ठिकाणी सुमारे दोन हजार छोट्या आणि तीनशे ते चारशे मोठ्या कंपन्या आहेत. उद्योगांना भयमुक्त वातावरण मिळावे, यासाठी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी २१ मार्च २०२३ रोजी औद्योगिक तक्रार निवारण पथकाची स्थापना केली होती. या अगोदर खंडणी विरोधी पथकांतर्गत औद्योगिक तक्रार निवारण पथकाचे कामकाज सुरू होते. या कक्षाचे प्रमुख पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी होते. दोन पथकाचे एकत्र कामकाज असल्याने कोणत्यातरी एका पथकासाठी पूर्ण वेळ देणे शक्य होत नव्हते. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील तक्रार निवारणासाठी पथकाची नव्याने स्थापना करण्यात आली आहे.

या पथकात लवकरच इतर अधिकारी, कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाणार आहेया औद्योगिक पथकाचे कार्यक्षेत्र पिंपरी-चिंचवड आयुक्तालय असून, औद्योगिक आस्थापना संदर्भात घडलेल्या गुन्ह्यांचा तपास या पथकाकडून केला जाणार आहे. औद्योगिक क्षेत्रात खंडणी मागणे, अशांतता माजवणे यासारखे गुन्हे होणार नाहीत, याबाबत पथकाकडून प्रतिबंधक उपाययोजना राबवल्या जाणार आहेत. औद्योगिक तक्रार निवारण पथकाच्या प्रमुखांना गुन्हे शाखेच्या पोलीस उपायुक्तामार्फत पोलीस आयुक्तांना अहवाल सादर करावा लागणार आहे.



### कोणत्या कामांमुळे खर्चात वाढ?

» पाईपलाईनचे काम गावठाण व अरुंद रस्त्यात करावे लागत आहे. पाण्याच्या टाकीचे काम करताना अतिरिक्त काम करावे लागले. वाढीव वितरण नलिका व रस्ते दुरुस्ती, वाढीव एमएस फीडर पाईपलाईन, वाढीव पाईपलाईन अशी कामे करण्यात आली. हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ही कामे आणि त्या कामांवर एकूण १९ कोटी ११ लाख इतक्या वाढीव निधीची आवश्यकता असल्याचेही पाणीपुरवठा विभागाने प्रस्तावात नमूद केले आहे.

# यात्रांमुळे वीसगाव खोऱ्यातील गावं लागली गजबजू

## तयारीसाठी चाकरमानी गावकऱ्यांची महिनाअगोदर गर्दी; जानेवारी ते मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत उत्साहात यात्रा भरविल्या जातात.

**पुणे | प्रतिनिधी**

साधारण पौष पौर्णिमेला मांढरदेव येथील काळुबाईची यात्रा सुरू होते. या यात्रेपासून भोर तालुक्यातील वीसगाव खोऱ्यातील ग्रामीण भागातील पळसोशी, बालवडी, आंबाडे, आंबवडे खोऱ्यातील टिटेघर, चिखलगाव, रावडी, कर्नावड, म्हाकोशी, वडतुंबी, कोर्ले या यात्रांचा हंगाम सुरू होतो.

जानेवारी ते मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत उत्साहात यात्रा भरविल्या जातात. माहेरी येणाऱ्या सासुरवासीण मुली-महिला, नातेवाईक मोठ्या उत्साहाने जत्रेस येत असतात. आनंदाचा,नातेवाईकांना भेटण्याचा, संवाद साधण्याचा,सोयरीक जुळविण्याचा,विचारांची देवाणघेवाण करण्याच हक्काचे व्यासपीठ म्हणून यात्रा किंवा जत्रेकडे पाहिले जाते. जत्रा ह्या प्रामुख्यानं तिथीनुसार भरतात. त्यामुळे दरवर्षी त्यांच्या तारखा बदलतात. ज्या देवाची जत्रा आहे, त्या देवाची प्रमुख तिथी पाहून जत्रा भरवली जाते. या यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी यात्रा कमिटी स्थापन केली जाते. याच बरोबरच वर्गणी कमिटी, तमाशा कमिटी, मिरवणूक कमिटी,छबिना कमिटी, पार्किंग कमिटी,फड कमिटी अशा समित्या गाव बैठकीत ठरवून यात्रेचे नियोजन केले जाते. यात्रेकरीता वर्गणी ठरवली जाते. गावकरी ग्रामदेवतेवरील श्रद्धेपोटी वर्गणी देतात.

या यात्रेच्या काळात ग्रामसेवक, तलाठी हे घरपट्टी, पाणीपट्टी, शेतसारा गोळा करतात.वर्षभराचा वसुल यात्रेच्या आठवड्यात होतो. दोन दिवस चालणाऱ्या यात्रेंमुळे गावा गावातून वनभोजन,काठी पालखी मिरवणूक, ढोल लेझीम, छबिना, तमाशा, खुस्ती आखाडा, मनोरंनाच्या कार्यक्रमांच्या आवाजाने गावे दणाणून जात आहेत.पुढील दोन तीन महिने तालुक्यात सुरू असणाऱ्या जत्रांमुळे खेडी गजबजू लागली आहेत.

दोन दिवसांच्या या जत्रेत देवदेवतांची पूजा,काठी पालखीची मिरवणूक, पुरणपोळीचा नैवेद्य, ढोल लेझीम, झबिना, आरती, कुस्त्या व ऑर्केस्ट्रा, तमाशा असे मनोरंजनाचे कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पाडले जातात. जेवणावळीचा आनंद वेगळाच असतो.या जेवणावळीत महिला महत्वाची भूमिका बजावतात.यात्रेच्या दोन दिवसांच्या कालावधीत महिलांना स्वयंपाकघरातून डोकं वर काढण शक्य होत नाही त्यामुळे यात्रा कमिटी यात्रेनंतर महिलांच्या करमणुकीसाठी ऑर्केस्ट्रा, तमाशाचे आयोजन केले जाते.



### चाकरमानी महिनाभर गावात

» गाव खेड्यात जत्रा हा उत्सवाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. गावाकडील चाकरमानी नोकरी, व्यवसाय,धंद्यानिमित्त आपलं गाव सोडून शहरात स्थिर झालेला असतो. पूर्वी चाकरमानी एकटाच शहरात उद्योगधंद्याकरीता राहत त्याचे कुटुंब गावाला शेती करत असत. मुल जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकत.परंतु गेल्या दहा पंधरा वर्षात चाकरमानी आपल्या कुटुंबासह शहरात राहू लागला. त्यामुळे त्याचे घर वर्षभर बंद असते. परंतु जत्रा महिन्यांवर आली की यात्रेची ओढ त्याला स्वस्थ बसू देत नाही.यात्रेच्या अगोदर आठ पंधरा दिवस येवून घरची साफसफाई,काय हव काय नको ते पहात असतो. कामाधंद्यासाठी बाहेरगावी गेलेले गावकरी यात्रेला गावात येऊ लागल्याने एरव्ही ओसाड असलेली गावे गजबजू लागली आहेत.

### वैशिष्ट्यपूर्ण प्रसाद

» ग्रामीण भागात यात्रेकरीता आलेलं नातेवाईक,मित्र यांना यात्रेनिमित्त बत्ताशा,रेवड्या, छोटा बुंदीचा लाडू, साखरेचे दोन पेढे,मोठी शेव, लाह्या,फरसाण घातलेला प्रसाद म्हणून दिला जातो. अशी प्रसादाची दुकान गावोगावी दोन ते तीन दिवसांकरीता थाटली जातात.या प्रसादाकरीता लाखोंची उलाढाल होते.

### खाद्यपदार्थांची रेलचेल

» बांगड्या भरणं, हातावर गोंदन गोंदवून घेण, मिठाईच्या दुकानात बर्फी, चिवडा, जिलबी, बत्ताशा आणि रेवड्या तसेच मुलं बासरी, पुंगी, वेळूच्या काठ्या, असल्या वस्तू आणि चिवडा, बर्फी, रेवड्या, फुटाणे, बत्ताशा असले पदार्थ घेऊन खायचे. भजे, गारीगार, बुढी के बाल असले पदार्थांवर मुलांच्या उड्या पडतात.मंदिराच्या आवारात मिठाई, आइस्क्रीम, कुल्फी, बांगड्या, खेळणी, शोच्या वस्तूंची दुकाने, पाळणे यामुळे महिला व मुलांनी मंदिर परिसर गजबजून जातो.वर्षातून एकदाच या जत्रेचा एक वेगळाच आनंद अनुभवयास मिळत असतो.

# सकाळच्या सत्रात लहानग्यांच्या शाळा सुरूच

## माजी मुख्यमंत्री व आत्ताचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आदेश काही शाळा डावलत असल्याचे दिसून येत आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पूर्व हवेलीत हडपसर पासून उरुळी कांचन पर्यंत सकाळच्या सत्रात लहान मुलांच्या काही शाळा चालू असून माजी मुख्यमंत्री व आत्ताचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आदेश काही शाळा डावलत असल्याचे दिसून येत आहे.

लहान मुलांना सकाळी लवकर उठावे लागत होते व त्यामुळे त्यांच्या तब्येतीवर परिणाम जाणवत होता. तसेच त्यांची सकाळी झोप मोड होत असल्याने मागील वर्षी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शाळा नऊ वाजल्या नंतर सुरू करण्यासंदर्भात काही आदेश दिले होते. त्यानुसार लहान मुलांच्या शाळांची वेळ आणि कार्यक्रम बदलेला दिसला; परंतु आता असे दिसून आले की हडपसर, शेवाळेवाडी, मांजरी, कदमवाकवस्ती, लोणी काळभोर, कुंजीरवाडी, उरुळी कांचन इत्यादी ठिकाणी काही शाळा सकाळी भरवल्या जात निदर्शनास आले आहे.

माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लहान मुलांच्या शाळांची वेळ बदलून सकाळी 9 वाजता करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु काही शाळांमध्ये विविध कारणांमुळे शाळा सकाळीच सुरू केल्या जात आहे. याचे मुख्य कारण म्हणजे शाळांच्या व्यवस्थेतील काही निर्णय, स्थानिक अडचणी किंवा शासनाच्या आदेशांचा अंमलबजावणी संदर्भातील गोंधळ असू शकतो.

या संदर्भात एका शिक्षणाधिकारी यांची चर्चा केली असता त्यांनी सांगितले की, याबाबत पालकांच्या काहीही तक्रारी नसल्यामुळे सकाळच्या सत्रातील शाळा सुरू आहेत. काही शाळांमध्ये अजूनही जुन्या वेळेनुसार शाळा सुरू केल्या जात आहेत. प्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना लागू करणाऱ्या शाळांनी वेळेची अंमलबजावणी केली पाहिजे; परंतु प्रत्येक शाळेच्या परिस्थितीनुसार काही फरक होऊ शकतो.



> गटशिक्षण अधिकाऱ्यांना याबाबत चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत. नर्सरी ते चौथी पर्यंत सकाळी नऊ वाजताच शाळा भरत असून, पूर्व हवेलीत काही ठिकाणी शाळा सकाळी लवकर भरत असली तर त्यानुसार शाळांची चौकशी करण्यात येईल.
>
> -भूषण जोशी, गटविकास अधिकारी हवेली